The E-Auction will be conducted on **"AS IS WHERE IS BASIS, AS IS WHAT IS BASIS, WHATEVER THERE IS BASIS AND NO RECOURSE BASIS."**

Sale will be done by the undersigned through E-Auction service provider PSB Alliance Private Limited through portal https://baanknet.com All the assets are located at the Plot no. A-14, Mahad Industrial Area, Village-Kambile, Raigad- 402 309. Asset Id No. 648 and 668 for search of auction property.

Date and Time of E-auction	Monday 14th December,2026; From 11:00 A.M. to 4:00 P.M.
Last Date and Time for submission of Expression of Interest (EOI) along with supporting documents	Thursday, 10th December 2026
Date and Time for Inspection (Assets to be auctioned are located at Mahad, Maharashtra)	Wednesday 18th November, 2026 to Thursday, 10th December 2026. (12 Noon to 4:00 P.M.)
Last date for submission Earnest Money Deposit	Thursday, 10th December 2026

Sr. No.	Description (Assets)	Reserve Price	EMD (approx. 10% of Reserve Price)	Incremental Bid Amount
				Amount in INR
Block A	Sale of Factory Land & Building with furniture and fixtures	70,59,260	7,05,926	1,00,000

Important Terms and Conditions of E-auction: 1) The Earnest Money Deposit ("EMD") of the Successful Bidder shall be liable to be forfeited if the Successful Bidder is found to be ineligible to participate in the auction or fails to make the payments within the stipulated timelines or otherwise fails to comply with the provisions of the Insolvency and Bankruptcy Code, 2016 and the applicable rules and regulations.
2. Bidding shall be permitted only upon successful remittance of the prescribed EMD for the respective Lot within the specified timeline into the designated Digital Wallet maintained on the electronic platform https://baanknet.com.
3. As on the date of issuance of Sale Certificate by the Liquidator, the current operational assets shall be transferred/ deemed to have been transferred subject to terms and condition of E-Auction Process Document.
4. The Registration charges and other applicable taxes/charges if any shall be paid extra by the successful bidder to conclude the sale.
5. Prospective bidders are advised to carefully refer to the E-Auction Process Memorandum for details of ongoing litigation, proceedings and other material information relating to the assets, as well as the applicable terms and conditions of the proposed auction.
6. Kindly refer to detailed terms and condition to understand the process of bidding thorough 15th E-Auction Process Document.

Important Note: a) The details of all the assets along with any pending legal cases/ on-going litigations if any, are to be mandatorily seen before participating in the auction. The prospective bidders are advised to make their own independent inquiries regarding Corporate Debtor. The Interested Applicants may refer to the complete E-Auction Process Document containing details of terms and conditions of the E-Auction on the website of the E-Auction service provider https://baanknet.com or may directly write an email to cirp.dacpl@gmail.com obtain the same.

b) It is clarified that, this invitation purports to invite prospective bidders and does not create any kind of binding obligation on the part of the Liquidator or the Company to effectuate the sale. The Liquidator has the absolute right to accept or reject any or all offer(s)/bids or adjourn/postpone/cancel the e-Auction or withdraw any property or portion thereof from the auction proceeding at any stage or disqualify any interested party / potential investor / bidder without any liability. Any revision in the sale notice will be uploaded on the website on https://ibbi.baanknet.com/eauction/ibbi/auc-listing

c. It is requested to all the bidders to kindly visit the website regularly.

Ms. Palak Swapnil Desai - Liquidator of Divya Agro Chem Private Limited (In Liquidation)
IBBI Regn. No.: IBBI/IPA-001/IP-P01517/2019 -2020/12515 (AFA valid till 30th June, 2027)
Address: 901, 9th Floor, Park Vistas, Opp. Lallubhai Park, Near MTNL, Andheri (W), Mumbai-400 058.
Place: Mumbai, Date: 18.11.2026



स्वयंमूल्यांकन टाळणाऱ्या शाळांवर कारवाई?

आरटीईतील २५ टक्के प्रवेश आणि सरकारी अनुदान बंद करणार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

वारंवार सूचना आणि मुदतवाढ देऊनही शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्यांतर्गत स्वयंमूल्यांकन करण्यास टाळाटाळ करणाऱ्या शाळांवर सरकारने आता कारवाईचा बडगा उगारला आहे. आरटीई कायद्यांतर्गत २५ टक्के विद्यार्थी प्रवेशाचा वाटा आणि शासनाकडून मिळणारे अनुदान बंद का करू नये, याबाबत खुलासा करण्याचे निर्देश राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) दिले आहेत.

राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांसाठी राज्यातील शाळांचा शैक्षणिक दर्जा आणि गुणवत्ता तपासण्यासाठी बंधनकारक करण्यात आले होते. १६ मार्च ते १५ एप्रिल २०२६ या कालावधीत ऑनलाइन स्वयंमूल्यांकन पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या पहिल्या मुदतीत राज्यातील

कोकण विभाग	
मुंबई शहर	२०
मुंबई उपनगर	१०४
ठाणे	९२
पालघर	१४३
रायगड	७०
रत्नागिरी	३
सिंधुदुर्ग	११६
एकूण	५४८



राज्यातील विभाग	
पुणे	२ २५६
छ. संभाजीनगर	२६४
अमरावती	१३४
नागपूर	५५६

१ लाख ८ हजार ९२ शाळांपैकी केवळ ४९ हजार ८४४ शाळांनीच प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे जवळपास निम्म्या शाळांनी या प्रक्रियेकडे दुर्लक्ष केल्याचे समोर आले.

त्यानंतर १ मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या मुदतीत ९६ हजार ६४० शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. तरीही सर्व शाळांची प्रक्रिया पूर्ण न झाल्याने १५ मेपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली. या मुदतीअखेर १ लाख ५ हजार ९९६ शाळांनी स्वयंमूल्यांकन पूर्ण केले. म्हणजेच एकूण शाळांपैकी २ हजार ९६ शाळांचे मूल्यांकन अपूर्ण राहिले. यामध्ये ९३ शाळा बंद असल्याचे निदर्शनास आले, तर उर्वरित २ हजार ३ शाळांनी वारंवार सूचना देऊनही स्वयंमूल्यांकन केले नाही.

या पार्श्वभूमीवर एससीईआरटीचे संचालक मंगेश जोशी यांनी सर्व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठविले आहे. स्वयंमूल्यांकन पूर्ण न करणाऱ्या २ हजार ३ शाळांकडून त्यांच्या स्तरावर खुलासा घेण्यात यावा. तसेच, या शाळांचा आरटीई कायद्यांतर्गत २५ टक्के विद्यार्थी प्रवेशाचा वाटा आणि शासनाकडून मिळणारे अनुदान बंद का करण्यात येऊ नये, याबाबतचा अहवाल एससीईआरटीकडे सादर करावा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

सिंहाचा पाठलाग व्हायरल...

भुवनेश्वर : गुजरातच्या अंबर्डी सफारी पार्कमध्ये वन कर्मचाऱ्यांनी बाईक आणि बोलेरो एसयूव्हीमधून एका सिंहाचा पाठलाग केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानंतर, वन विभागाने या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सफारी पार्कमध्ये वन कर्मचाऱ्यांनी बाईक आणि एसयूव्हीमधून सिंहाचा पाठलाग केल्याचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर, कर्मचारी सिंहाला त्याच्या पिंजऱ्याच्या दिशेने वळवण्याचा प्रयत्न करत होते, असा खुलासा वन विभागाने केला आहे.

अपेलंट तर्फे वकील ॲड. यतिश रत्नाकर खानोलकर
नेमली तारीख १६/११/२०२६
निशाणी नंबर :८९

जाहीर नोटीस

ओरोस येथील मे. तद्‌र्थ जिल्हा न्यायाधिश-१ साहेब यांचे न्यायालयात
रेग्युलर दिवाणी अपिल नंबर ८०/२०१५

सुमती गणपत राणे, वगैरे .... अपेलंट
विरुध्द
राजाराम धोंडी परब, वगैरे ...रेस्पॉडंट

प्रति.
रेस्पॉडंट नंबर १३ड) श्रीमती छाया सहदेव परब,
राहा. रुम नंबर ७, सेक्शन ३७, सेक्टर ४,राऊळ मंदिर नजिक, उल्हास नगर, ठाणे यांसी,

ज्याअर्थी, अपेलंट **सुमती गणपत राणे, वगैरे** यांनी सदरचे अपिल हे कुडाळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) साहेब यांचे कोर्टातील रेग्युलर दिवाणी मुकदमा नंबर ९२/१९९१ मध्ये दिनांक ११/०३/२०१५ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द नाराज होवून सदरचे अपिल रेस्पॉडंट यांचे विरुध्द दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या नोटीसा मे. कोर्टामार्फत व रजि.ए.डी.टपालाने **रेस्पॉडंट नंबर १३ड यांना** अपिलातील नमूद पत्त्यावर पाठविण्यात आल्या होत्या. परंतु नमूद पत्त्यावर **रेस्पॉडंट नंबर १३ड** यांना अपिलाच्या नोटीसीची बजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही.

त्याअर्थी, या अपिलासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी **दिनांक १६ माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता** तुम्ही स्वतः अगर आपले वकिलांमार्फत मे. कोर्टात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर नोटीस बजावण्यात येत आहे.

आपणांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अपिलाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ माहे ऑक्टोबर सन २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली जाहिर नोटीस.

तयार करणार, शिक्का आदेशावरुन,
सही/-(प्रविण प्रमोद पराडकर) **सही/- (सौ. एन. एस.सावंत)**
कनिष्ठ लिपीक **अधीक्षक, (न्याय)**
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस, **जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस,**

संक्षिप्त

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क परीक्षा पात्रतेत बदल

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या महाराष्ट्र गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ संदर्भात आयोगाने महत्त्वाचे शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या परीक्षेच्या जाहिरातीनुसार, काही पदांसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेबाबत स्पष्टीकरण दिले असून, उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलमधील शैक्षणिक अर्हता सुधारित करण्याची संधी दिली आहे. आयोगाने १३ नोव्हेंबर रोजी हे शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले आहे. आयोगाने २५ जून रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीनुसार, गट-क संवर्गातील विविध पदांच्या एकूण २६,७३७ रिक्त जागांसाठी भरती प्रक्रिया राबवत आहे. या भरतीसंदर्भात ६ नोव्हेंबर रोजी यापूर्वी शुद्धिपत्रक प्रसिद्ध केले होते. त्यामध्ये काही पदांच्या शैक्षणिक पात्रतेबाबत अधिक स्पष्टता दिली आहे. शुद्धिपत्रकानुसार परिशिष्ट एकमधील अनुक्रमांक २३ वरील शिक्षण संचालक आणि व्यवसाय निदेशक संवर्गातील विविध विषयांच्या पदांसाठी ३१ जुलै २०२६ रोजीच्या सेवाप्रवेश नियमांनुसार आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि शासनपत्रातील पात्रता ग्राह्य धरणार आहे.

पनवेल-वसई रेल्वे मार्गासाठी अजून दोन मंजुऱ्यांची प्रतीक्षा

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

पनवेल-वसई या ६९ किलोमीटर लांबीच्या प्रस्तावित उपनगरीय रेल्वेमार्गाला रेल्वे बोर्डाच्या प्रकल्प मूल्यांकन समितीने नुकतीच मंजुरी दिली आहे. तरी हा प्रकल्प प्रत्यक्षात येण्यासाठी आणि निविदा प्रक्रिया सुरू होण्यासाठी अजून नीती आयोग आणि केंद्रीय वित्त मंत्रालयाच्या दोन महत्त्वाच्या मंजुऱ्यांची प्रतीक्षा असल्याचे रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत हा ६९.२३ किलोमीटर लांबीचा मार्ग उभारण्यात येणार आहे. यामध्ये २८ किलोमीटरचा मार्ग उन्नत असून संपूर्ण कॉरिडॉरवर १७ स्थानके उभारली जाणार आहेत.

'जेजे'च्या पहिल्याच पीएचडी प्रवेशाला ८६ अर्ज दाखल

कला विषयाला सर्वाधिक ४६ अर्ज

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाइन डिनोव्हो विद्यापीठात पहिल्यांदाच सुरू करण्यात आलेल्या पीएचडी प्रवेश प्रक्रियेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. विद्यापीठाने जाहीर केलेल्या १६ जागांसाठी एकूण ८६ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. यामध्ये सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधील संशोधनासाठी सर्वाधिक ४६ अर्ज आले आहेत. तर, डिझाइन विषयासाठी ३३ आणि आर्किटेक्चरसाठी अवघे सात अर्ज प्राप्त झाले आहेत.

विद्यापीठातील उपलब्ध प्राध्यापक आणि त्यांच्या मार्गदर्शन क्षमतेनुसार पीएचडीच्या सुमारे ३५ ते ४० जागा उपलब्ध होऊ शकतात. मात्र, पहिल्याच वर्षी सर्व जागा भरण्याऐवजी १६ जागांवर प्रवेश देण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे. प्राध्यापकांना आठ, सहयोगी प्राध्यापकांना सहा, तर सहाय्यक प्राध्यापकांना चार संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता येणार आहे.

प्राप्त झालेल्या ८६ अर्जांची पुढील आठवड्यात छाननी केली जाणार आहे. उमेदवारांनी निवडलेला संशोधनाचा विषय, संबंधित विषयासाठी मार्गदर्शक उपलब्धता आणि शैक्षणिक पात्रता या निकषांवर अर्जांची पडताळणी होईल. त्यानंतर पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. या संपूर्ण प्रक्रियेनंतर डिसेंबरमध्ये अंतिम निवड यादी जाहीर केली जाणार असल्याची माहिती विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

● सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टला 'डी नोव्हो' श्रेणीत अभिमत विद्यापीठाचा ऑक्टोबर २०२३ मध्ये दर्जा मिळाला. त्यानंतर सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट आणि सर जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर या तीन संस्थांचा विद्यापीठाच्या छत्राखाली समावेश झाला. यामुळे संस्थेला स्वतंत्रपणे अभ्यासक्रम सुरू करण्यासह संशोधनविषयक उपक्रम राबविण्याची संधी मिळाली. त्याचाच एक भाग म्हणून यंदापासून पीएचडी प्रवेश सुरू करण्यात आले आहेत.

नवोपक्रम स्पर्धेकडे शिक्षकांची पाठ

राज्यभरातून केवळ ११२ जणांची नोंदणी!

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) आयोजित केलेल्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेला शिक्षकांचा अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे. राज्यभरातून आतापर्यंत केवळ ११२ शिक्षकांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे या स्पर्धेकडे राज्यभरातील शिक्षकांनी पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे.

नवीन शैक्षणिक धोरण, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान, निपुण महाराष्ट्र आणि अध्ययन निष्पत्ती या विषयांवर शिक्षकांना नवोपक्रम सादर करता येणार आहेत. सात गटांमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत अंगणवाडी सेविकांपासून शिक्षक, मुख्याध्यापक, अध्यापकाचार्य आणि शिक्षणाधिकारी यांना सहभागी होता येणार आहे. यासंदर्भात २९ जुलै २०२६ रोजी सर्व शाळांना निर्देश दिले होते. मात्र, या आवाहनाला अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही.

शाळांमधील अध्यापनाबरोबरच शिक्षकांना विविध प्रशासकीय कामांचा सामना करावा लागत आहे. एसआयआरची जबाबदारी, जनगणनेची कामे, निवडश्रेणी प्रशिक्षण, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेची तयारी आणि अवघ्या १५ दिवसांवर आलेली पॅट परीक्षा यामुळे शिक्षकांची दमछाक होत आहे. या कामांच्या व्यापात नवोपक्रम तयार करणे, त्याचे लेखन करणे आणि ऑनलाइन नोंदणीसाठी वेळ देणेही शक्य होत नसल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

● शिक्षकांनी एकीकडे नावीन्यपूर्ण शैक्षणिक प्रयोग राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते; तर दुसरीकडे त्यांच्यावर विविध अशैक्षणिक कामांची जबाबदारी सोपविली जात आहे. परिणामी, शिक्षकांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित स्पर्धेलाच अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे.

खासगी शाळांच्या शुल्कवाढीच्या मनमानीला लगाम कोण घालणार?

शालेय शिक्षणातही एफआरएसारखी यंत्रणा उभारण्याची मागणी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

खासगी शाळांच्या शुल्कवाढीवर नियंत्रण ठेवणारे नियम आहेत; मात्र त्यांची अंमलबजावणी कितपत होते, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरवर्षी शुल्कात होणारी वाढ, त्यामागील कारणांबाबतची अस्पष्टता, शाळांच्या आर्थिक व्यवहारांतील पारदर्शकतेचा अभाव यामुळे पालकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे उच्च व व्यावसायिक शिक्षणाच्या धर्तीवर शालेय शिक्षणासाठीही स्वतंत्र शुल्क नियामक प्राधिकरण स्थापन करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

शाळा शुल्कवाढीचा निर्णय घेतात; मात्र त्यासाठी पालकांना विश्वासात घेतले जाते का, वाढीमागील आर्थिक कारणे स्पष्ट केली जातात का, याची खातरजमा करणारी प्रभावी यंत्रणा नसल्याची पालकांची तक्रार आहे. अनेक शाळांमधील पालक-शिक्षक संघ व शुल्क नियामक समित्या केवळ कागदावरच असल्याचा आरोप होत आहे. शुल्कवाढीचा प्रस्ताव पालकांसमोर न मांडणे, त्यावर चर्चा न घडवणे, पालकांच्या हरकतींकडे दुर्लक्ष करणे, असे प्रकार रोखण्यासाठी या समित्यांच्या कामकाजाचे नियमित परीक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. शुल्कवाढ करायची असेल, तर त्यामागील खर्चाचा तपशील, आर्थिक कारणे शाळांनी पालकांसमोर मांडणे बंधनकारक करावे, अशी भूमिका पालक संघटनांनी घेतली आहे.

शाळांना शुल्कापोटी मिळणाऱ्या कोट्यवधी रुपयांचा विनियोग नेमका कसा होतो, याचा हिशेब पालकांना मिळायला हवा, अशी मागणी पुढे आली आहे. शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन, शैक्षणिक सुविधा, इमारतींची देखभाल आणि अन्य खर्च यांचा तपशील स्पष्ट होण्यासाठी प्रत्येक शाळेचे स्वतंत्र विशेष लेखापरीक्षण करावे. त्याचा वार्षिक अहवाल सार्वजनिक करावा. शुल्कवाढ प्रस्तावाची कागदपत्रे पालकांसाठी उपलब्ध करून द्यावीत, अशा मागण्या केअर ऑफ पब्लिक सेफ्टी असोसिएशन संघटनेने केल्या आहेत.

● शुल्कवाढीविरोधात आवाज उठवणाऱ्या पालकांना शाळा व्यवस्थापनाकडून त्रास दिला जात असल्याच्या तक्रारीही पुढे येत आहेत. त्यामुळे पालकांच्या तक्रारींची दखल घेणारी यंत्रणा उभारण्याची गरज व्यक्त होत आहे. तक्रारींची ठरावीक कालमर्यादेत चौकशी, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई आणि कारवाईचा तपशील सार्वजनिक करण्याची व्यवस्था असावी. शुल्क नियामक समित्यांचे निर्णय, शाळांना दिलेल्या सूचना आणि केलेल्या कारवाईची माहिती एकाच डिजिटल पोर्टलवर उपलब्ध करून द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड
दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन बिल्डिंग, मुंबई-400020.

रिक्ति अधिसूचना क्र: एमआरव्हीसी/ई/पीई(एस एण्ड टी)/29/2026 दिनांक 16.11.2026

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. येथे कंत्राटी पद्धतीने **"प्रोजेक्ट इंजिनिअर (सिग्नल व दूरसंचार)"** या पदासाठी IDA E1 स्केलमधील 09 पद भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. ई-मेलद्वारे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख **15.12.2026** आहे. अधिक माहितीसाठी कृपया **https://mrvc.indianrailways.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी. **शुद्धीपत्र, जर असेल, तर ते फक्त वैबसाईट वर प्रसिद्ध करण्यात येईल.**

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate
क्षेत्रीय कार्यालय मुंबई उत्तर

दागिने मूल्यांकनकर्त्यांची आवश्यकता
अर्ज मागवण्यात येत आहेत

कॅनरा बँक त्यांच्या मुंबई उत्तर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सोने कर्ज देणाऱ्या शाखांमध्ये (कांदिवली, गोरेगाव, वर्सोवा, मालाड, दहिसर, भाईंदर, मिरा रोड, रणगाव, डहाणू वगैरे) **दागिन्यांचे मूल्यांकनकर्ते** म्हणून सूचीबद्ध करण्यासाठी अनुभवी आणि पात्र व्यक्तींकडून अर्ज मागवत आहे.

इच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज खालील गोष्टींसह सादर करावेत:
- **शैक्षणिक पात्रतेचा तपशील**
- **प्रत्यक्ष अनुभवाचा तपशील**
- **केवायसी दस्तावेज**
- **दोन स्थानिक संदर्भ**
- **जीएसटीआयएन** (उपलब्ध असल्यास)

अंतिम तारीख : ३०.११.२०२६

तपशिलांसाठी, तुमच्या जवळच्या **कॅनरा बँक** सोने कर्ज शाखेशी संपर्क साधा.
ई-मेल : advromumnorth@canarabank.com
आणि
मोबाईल क्र. ६३६१११२९२४
क्षेत्रीय कार्यालय- मुंबई उत्तर

ई-निविदा सूचना क्र. ५ सन २०२६-२७

यांत्रिकी उपविभाग, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत विंधन विहीर / कूपनलिका खोदाई, हातपंप उभारणी, कट्टाबांधणी, क्षमता चाचणी कामांसाठी नोंदणी व दर निश्चिती करणे ई- निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदेचा सविस्तर तपशील दिनांक: - १७ / ११ / २०२६ पासून **www.mahatenders.gov.in** या वेबपोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

ई-निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा **www.mahatenders.gov.in** या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाइन निविदा सूचनेनुसार राहतील.

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणीपुरवठा विभाग
जिल्हा परिषद, नंदुरबार

कोल्हापूर महानगरपालिका
सार्वजनिक बांधकाम विभाग
जाहीर निविदा नोटीस क्र. 95

सर्व कॉन्ट्रॅक्टर यांना कळविणेत येते की, पी.एच.सी. चे बांधकाम करणे, नर्सरी गार्डन विकसित करणे इ. कामांसाठी निविदा मागविण्यात येत आहेत. या कामाची सविस्तर यादी वेबसाईटवर पाहण्यास मिळेल.

- निविदा फॉर्म प्राप्त करणेचा व बयाणा रक्कम भरणेचा तसेच निविदा फॉर्म सादर करणेचा कालावधी दिनांक १८/११/२०२६ पासून सकाळी ९.३० पासून दिनांक २५/११/२०२६ रोजी अखेर दुपारी ३.३० वाजेपर्यंत.
- निविदा उघडणेचा दिनांक २६/११/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता.
- निविदा फॉर्म https://mahatenders.gov.in या वेबसाईटद्वारे प्राप्त करावा व भरावा लागेल.

सविस्तर टेंडर नोटीस, अटी, शर्ती वगैरे माहिती ऑफिस वेळेत सकाळी ११ ते ५ कार्यालयात तसेच वरील वेबसाईटवर पाहण्यास मिळेल. क. ता. १७/११/२०२६

सही/-
शहर अभियंता
कोल्हापूर महानगरपालिका

अपेलंट तर्फे वकील ॲड. यतिश रत्नाकर खानोलकर
नेमली तारीख १६/११/२०२६
निशाणी नंबर : ८८

जाहीर नोटीस

ओरोस येथील मे. तद्‌र्थ जिल्हा न्यायाधिश-१ साहेब यांचे न्यायालयात
रेग्युलर दिवाणी अपिल नंबर ८०/२०१५

सुमती गणपत राणे, वगैरे .... अपेलंट
विरुध्द
राजाराम धोंडी परब, वगैरे .... रेस्पॉडंट

प्रति.
रेस्पॉडंट नंबर (१८) श्री. यशवंत गणपत राणे,
राहा. प्रित हाऊस, रुम नंबर ६, सर्वोदय नगर, भांडुप (पश्चिम),मुंबई ४०० ०७८ यांसी.

ज्याअर्थी, अपेलंट **सुमती गणपत राणे, वगैरे** यांनी सदरचे अपिल हे कुडाळ येथील मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) साहेब यांचे कोर्टातील रेग्युलर दिवाणी मुकदमा नंबर ९२/१९९१ मध्ये दिनांक ११/०३/२०१५ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द नाराज होवून सदरचे अपिल रेस्पॉडंट यांचे विरुध्द दाखल केलेले आहे.

सदर अपिलाच्या नोटीसा मे. कोर्टामार्फत व रजि.ए.डी.टपालाने **रेस्पॉडंट नंबर १८ यांना** अपिलातील नमूद पत्त्यावर पाठविण्यात आल्या होत्या. परंतु नमूद पत्त्यावर **रेस्पॉडंट नंबर १८** यांना अपिलाच्या नोटीसीची बजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही.

त्याअर्थी, या अपिलासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक **१६ माहे नोव्हेंबर सन २०२६ रोजी सकाळी १०.३०** वाजता तुम्ही स्वतः अगर आपले वकिलांमार्फत मे. कोर्टात उपस्थित होण्यासाठी याव्दारे तुमच्यावर नोटीस बजावण्यात येत आहे.

आपणांस या जाहिर नोटीसीने असे कळविण्यात येते की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसुर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत अपिलाची सुनावणी केली जावून त्याचा निर्णय केला जाईल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१ माहे ऑक्टोबर सन २०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली जाहिर नोटीस.

तयार करणार, शिक्का आदेशावरुन,
सही/-(प्रविण प्रमोद पराडकर) **सही/- (सौ. एन. एस.सावंत)**
कनिष्ठ लिपीक **अधीक्षक, (न्याय)**
जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस, **जिल्हा न्यायालय, सिंधुदुर्ग-ओरोस,**

SHREE SAI NO. 2 CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.
Nirabai Patil Marg, Manvel Pada Road, Virar (East), Taluka Vasai, District Palghar – 401305
DEEMED CONVEYANCE NOTICE
Notice is hereby given that the above Society has applied to this office for declaration of Deemed Conveyance of the following property. The next hearing is kept on 03/12/2026 at 2.00 P.M.
M/s. Shree Siddhi Builder through its Proprietor Shri Ashok V. Patil and all concerned persons having any right, title, interest, claim or objection in the said property may submit their say at the time of hearing at the venue mentioned below. Failure to submit their say, it shall be presumed that nobody has objection and further action will be taken.
DESCRIPTION OF THE PROPERTY:
Village Virar (East), Taluka Vasai, District Palghar – 401305.

Survey No.	Hissa No.	Area(Sq. Mtrs.)
121	3	505.00

Sd/-
(Digambar Hausare)
Competent Authority
Dist, Dy. Registrar, Co-Op. Societies, Palghar
Place : Siddhivinayak Residency Ganray Apartment, Near ISKCON Temple Palghar (E), Tal. Dist. Palghar.
Date :17/11/2026

जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे पक्षकार मे. निराग प्राईम इन्फ्रा, भागीदार श्री. चिराग जनकभाई दोशी (पत्ताः शॉप नं. १५, द गार्डनव्ह्यू अपार्टमेंट, विरार नगर, विरार (प.)), हे जमीन मालक श्री. प्रवीण भगवानजी शहा (पत्ताः ए/९०२, वृंदावन टॉवर, चिकोवाडी, बोरिवली (प.), मुंबई) यांच्यासोबत खालील परिशिष्टात नमूद मिळकतीबाबत विकास करारनामा (Development Agreement) करण्यास इच्छुक आहेत. सदर मिळकतीचे टायटल स्पष्ट व बोजाविरहित असल्याची हमी जमीन मालकांनी दिली आहे.

सदर मिळकतीवर कोणाचाही विक्री, गहाण, वारसाहक्क, कुळवहिवाट, लिस पेंडन्स (lis pendens) किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क, दावा किंवा हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कागदोपत्री पुराव्यांसह खाली सही करणाऱ्यांकडे लेखी कळवावे. विहित मुदतीत हरकत न आल्यास कोणाचाही हक्क नसल्याचे किंवा तो सोडून दिल्याचे समजून माझे पक्षकार करारनामा पूर्ण करतील.

मिळकतीचे परिशिष्ट

गाव चंदनसार, ता. वसई, जि. पालघर (VVCMC हद्द) येथील सर्व्हे नं. ६१/६, हिस्सा नं. ०८, क्षेत्रफळ ०० हे. १४ आर १० चौ.मी. (१४१० चौ.मी.) जमीन व त्यावरील सर्व एफ.एस.आय. (FSI), टी.डी.आर. (TDR) आणि संलग्न हक्कांसह.

रुपेश शिंदे वकील
पत्ता : अजंता स्क्वेर मॉल, ग्राउंड फ्लोर, बोरिवली कोर्ट जवळ, मार्केट लेन, बोरिवली पश्चिम.
ठेकाण : वसई दिनांक : १८/११/२०२६

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लिमिटेड
दुसरा मजला, चर्चगेट स्टेशन बिल्डिंग, मुंबई-400020
रजिस्ट्री सं. डी. एल. - 33004/99 REGD. No. D. L- 33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी. जी.- एम. एच.- अ.-13112026-277894
CG-MH-E-13112026-277894
असाधारण
EXTRAORDINARY
भाग II-खण्ड 3-उपखण्ड (i)
PART II-Section 3-Sub-section (i)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 5874] नई दिल्ली, सोमवार, नवम्बर 9, 2026/कार्तिक 18, 1948
No. 5874] NEW DELHI, MONDAY, NOVEMBER 9, 2026/KARTIKA 18, 1948

रेल मंत्रालय
(मध्य रेल्वे)
अधिसूचना
मुंबई, 05 नोव्हेंबर, 2026
रेल्वे कायदा 1989 (1989 चा 24) चे कलम 20E च्या अंतर्गत अधिसूचना

का. आ. 6107(अ).- केंद्र सरकार ने रेल्वे कायदा, 1989 (1989 चा 24) (ज्याला यामध्ये इथून पुढे उक्त कायदा म्हणून निर्देशिलेला आहे) चे कलम 20 (क) चे उपकलम (1) च्या अन्वये भारताचे राजपत्र, असाधारण, भाग II, खंड 3, उपखंड (ii), दिनांक 18 डिसेंबर 2025 मध्ये प्रकाशित भारत सरकारच्या रेल्वे मंत्रालयाच्या (रेल्वे बोर्ड) अधिसूचना क्रमांक का. आ. 5880 (अ), दिनांक 16 डिसेंबर 2025 (ज्याला यामध्ये इथून पुढे उक्त अधिसूचना म्हणून निर्देशिलेला आहे) द्वारे उक्त अधिसूचने सोबत अनुसूचित विनिर्दिष्ट केलेली जमीन, **महाराष्ट्र राज्यातील तालुका उल्हासनगर, जिल्हा ठाणे मध्ये विशेष रेल्वे प्रकल्पासाठी म्हणजे महाराष्ट्र राज्यातील मुंबई शहर परिवहन प्रकल्प-IIIA अंतर्गत विशेष रेल्वे प्रकल्प "कल्याण-बदलापुर ३री व ४थी रेल्वे मार्ग प्रकल्प (14.05 किमी)"** च्या निर्माण, देखभाल, व्यवस्थापन आणि कामकाजासाठी संपादित करण्याचा उद्देश घोषित केलेला होता.

आणि, उक्त अधिसूचनेचा सारांश, उक्त कायद्याच्या कलम 20 (क) च्या उपकलम (4) च्या अंतर्गत **उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर उप-विभाग, उल्हासनगर, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र** दैनिक वर्तमान पत्र, **"दि फ्री प्रेस जनरल" (इंग्रजी),** और **"लोकमत" (मराठी),** मध्ये दिनांक 31.12.2025 ला प्रसिद्ध केला होता.

आणि सक्षम प्राधिकरी याना कोणताही आक्षेप प्राप्त झालेला नाही.

आणि उक्त कायद्याच्या कलम 20 (ड) च्या उपकलम (1) प्रमाणे "सक्षम प्राधिकाऱ्याने" केंद्र सरकारला आपला अहवाल सादर केलेला आहे.

म्हणून, आता, सक्षम प्राधिकाऱ्याचा उक्त अहवाल प्राप्त झाल्यावर व उक्त कायद्याच्या कलम 20 (ड) च्या उपकलम (1) द्वारे प्राप्त अधिकारांचा उपयोग करून, केंद्र सरकार जाहीर करत आहे कि या अधिसुचने संलग्न अनुसूची मध्ये निर्देशित जमीन उपरोक्त प्रयोजनेसाठी संपादित केली जाईल.

आणि तसेच, केंद्र सरकार उक्त कायद्याच्या कलम 20 (ड) च्या उपकलम (2) अनुसार, याद्वारे घोषित करत आहे की, शासकीय राजपत्रातील या अधिसूचनेच्या प्रकाशित झाल्यावर या अधिसूचने सोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये, विनिर्दीष्टीत केलेली जमीन, सर्व भारांपासून मुक्त होऊन केंद्र सरकार मध्ये पूर्णपणे निहित होईल.

अनुसूची

महाराष्ट्र राज्यातील मुंबई शहर परिवहन प्रकल्प-IIIA च्या अंतर्गत विशेष रेल्वे प्रकल्प "कल्याण-बदलापुर ३री व ४थी रेल्वे मार्ग प्रकल्प (14.05 किमी)" च्या हेतू उल्हासनगर (काटेमानिवली) गाव, तालुका उल्हासनगर, जिला ठाणे मधील रेल्वे कायदा, 1989 (1989 चा 24) च्या अनुसार संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीचे संरचना सहित किंवा त्या शिवाय संक्षिप्त वर्णन

राज्य - महाराष्ट्र			जिल्हा - ठाणे				
तालुका - उल्हासनगर			गावचे नाव - उल्हासनगर (काटेमानिवली)				
अ. क्र.	गावचे नाव	न.भू.क्र. अनुसार भूधारक चे नाव	न.भू. क्र.	हिस्सा नं.	भू धारणा पद्धती	न.भू.क्र. चे अनुसार एकूण क्षेत्र (चौ.मी)	२० ई साठी संपादन क्षेत्र (चौ.मी)
1	काटेमानिवली	1. युनिटेक लिमिटेड 2. मे. शुभम इन्फ्रा तर्फे भागीदार 1. शशांक चंद्रभान मिश्रा 2. मयंक चंद्